# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विविध शिष्यवृत्ती योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या अर्ज मुदतवाढीसंदर्भात

**शैक्षणिक वर्ष २०१६–१७**

**"क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना"**
**"आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"**
**"राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"**
**" सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना"**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६–१७ या वर्षात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत परिपत्रक क्र. १९९/२०१६ अन्वये दि. २०/१२/२०१६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

सदर **मुदत दि. २६/१२/२०१६** पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. परिपत्रकातील विहित नियम व अटीनुसार ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज पाठविण्यात यावेत व त्याची हार्ड कॉपी (Hard copy) संबंधित कागदपत्रांसह **दि. ३०/१२/२०१६** पर्यत या कार्यालयास प्रत्यक्ष हस्तपोच सादर करण्यात यावी. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना वरील शिष्यवृत्ती योजनेचा मागील वर्षी ( पदवी–प्रथम किंवा द्वितीय वर्षात व पदव्युत्तर प्रथम वर्षात ) फायदा मिळाला नसेल असे प्रवेशीत विद्यार्थी सदर योजनेसाठी विहित नियम व अटीनुसार यावर्षी अर्ज करण्यास पात्र असतील.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ : शै.प्रवेश/४९२३
दिनांक :२०/१२/२०१६

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता
मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७
मा. प्राचार्य, विद्यापीठाशी सलंग्नित सर्व अव्यवसायिक महाविद्यालय.

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विहित मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.